**Dy. Commissioner of Police, Zone-6,**
**Chembur, Mumbai -71**
**पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ६,**
**चेंबूर (पूर्व), मुंबई- ७१**
**Email Id - dcpzone6-mum@mahapolice.gov.in**
**Date 25/09/2021**

---

## प्रेस नोट - 9

### धोकादायक व्यक्ती व सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधक सराईत गुंड सिध्दांत वाकोडे स्थानबध्द

दिनांक १४/०५/२०२१ रोजी सायंकाळी ६:०० वा. फिर्यादी नामे सोहेल रेहमान इनामदार,वय २० वर्षे यांनी त्यांच्या मामाची मुलगी साहिस्ता व तिचा मित्र अब्बास या दोघांच्या मैत्रीस केलेल्या विरोधाचा राग मनात धरून इसम नामे सिध्दांत शशिकांत वाकोडे व त्याचे साथिदार यांनी आपसात संगणमत करून फिर्यादीच्या घरात घुसुन फिर्यादी व त्यांचे आईला जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला म्हणुन फिर्यादींनी दिलेल्या तक्रारीवरून देवनार पोलीस ठाणे,गु.र.क्र.३२१/२०२१ कलम ४५२,३२४, ३२३,५०६(२), ४२७, ५०४,३४ भा.द.वि. सह कलम ३७ (१) (अ),१३५ म.पो.का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाच्या तपासात असे निष्पन झाले की, इसम नामें सिध्दांत शशिकांत वाकोडे, वय २६ वर्षे, रा.ठी. देवनार मेन गेट समोर, ए/१, धारवाला गल्ली, टाटानगर, गोवंडी, स्टेशन रोड, गोवंडी, मुंबई हा देवनार व आजुबाजु परिसरात दहशत निर्माण करून त्याचे साथीदारांसह खुनाचा प्रयत्न करणे, गैरकायदयाची मंडळी जमवून दंगा करणे, घातक शस्त्र जवळ बाळगणे, जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, जबर दुखापत पोहचवणे, विनयभंग करणे, जिवे ठार मारण्याची धमकी देणे, असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे करून त्याची दहशत पसरवून सार्वजनिक शांतता व सुरक्षितेतसाठी धोकादायक व्यक्ती झाला असुन त्याचे विरूध्द देवनार पोलीस ठाणे, मानखुर्द पोलीस ठाणे व गोवंडी पोलीस ठाणे असे विविध पोलीस ठाण्यात गुन्हे नोंद आहेत.

नुमद इसमा विरूध्द सन २०१४ पासुन गुन्हे नोंद असुन त्याच्याविरूध्द यापुर्वी फौजदारी दंड प्रकीया संहीत व महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाई करून देखील त्याच्या वर्तणुकीत सुधारणा झाली नसल्याचे निदर्शनास आल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, देवनार पोलीस ठाणे यांनी इसम नामे सिध्दांत वाकोडे, वय २६ वर्षे यांचे विरूध्द दाखल गुन्हयाचे अनुषंगाने एम.पी.डी.ए.कायदा १९८१ अन्वये स्थानबध्द कार्यवाहीसाठी पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-६, मुंबई यांचे मार्फतीने मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी दिनांक २१/०९/२०२१ रोजी इसम नामे सिध्दांत शशिकांत वाकोडे, वय २६ वर्षे यास स्थानबध्द करण्याचे आदेश पारीत केल्याने, दिनांक २२/०९/२०२१ रोजी त्यास ठाणे मध्यवर्ती कारागृहात स्थानबध्द करण्यात आले.

यावर्षी जानेवारी २०२१ पासून परिमंडळ ६ अंतर्गत “ महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ति, दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणारे व्यक्ती (व्हिडीओ पायरेटस), वाळु तस्कर व अत्यावश्यक वस्तुंचा काळा बाजार करणारे व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम (M.P.D.A) ” १९८१ अन्वये केलेली ही दुसरी कारवाई असून यापूर्वी ट्रॉम्बे पोलीस ठाणे गु.र.क्र.२६/२०२१ कलम ३९४,३४१, ५०६(२),५०६,५०४, ३४ मधील आरोपी नौशाद उर्फ नझीर उर्फ नासीर सलीम खान याचेवर एम पी डी ए कायदयाखाली कारवाई करण्यात आली आहे. सार्वजनिक सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणारे व वारंवार गुन्हे करून सार्वजनिक सुव्यवस्था धोक्यात आणणाऱ्या गुन्हेगारांची गय केली जाणार नसुन त्यांच्या विरुद्ध भविष्यात देखील अशा प्रकारची कडक कार्यवाही करण्यात येईल.

०००००० 